# ध्यानातील अनुभव

## अहंम ब्रम्हासि तत्वमसि !

**डॉ. मंगल हेमंत धेंड**
**पुणे: संपर्क:९४२०६९६४९३**

मी डॉक्टर मंगल हेमंत धेंड! पुण्यातील एका नामांकित इंजिनियरिंग कॉलेज मध्ये विद्युतविभागामध्ये गेली ३० वर्षे अध्यापनाचे कार्य करत आहे. तंत्रज्ञान शिकवता शिकवता हे प्रकर्षाने जाणवू लागले कि विद्यार्थ्यांना त्यांच्या सुखी जीवनासाठी काही जीवन शिक्षण,आध्यात्मिक व होलिस्टिक नितिमूल्ये असे आपण शिकवली पाहिजे! ध्यान धारणेमुळे माझी ऊर्जा व क्षमता विपुल आहे. त्यामुळे नोकरी करता करता गेल्या चार वर्षापूर्वी २०१८ मध्ये ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर चालणारी विहंगम टेकनो होलिस्टिक ऑर्गनायझेशन स्थापन केली व तितिक्षा या आमच्या आध्यात्मिक केंद्रात आता लवकरच सुदर्शन पिरॅमिड बांधणार आहोत.

२००४-५ मधे मी अमेरिकेहून आलेले श्री. भिडे यांच्या कोर्स मधे अल्फा व व्हिज्युअलायझेशन हे शिकण्यास १ महिना जात होते होते. तेव्हा ते म्हणाले चला पाचगणीला ३ दिसांच्या शिबिराला. काहीही माहित नसताना आम्ही ४-५ वर्षाच्या हर्षलला घेऊन गेलो होतो. त्यावेळेस गणेशपुरीतील नित्यानंद महाराज यांचे शिष्य मुक्तानंद महाराज यांचे शिष्य साई काका यांची दीक्षा आम्हा तिघांना नकळत झाली होती. पण यामध्ये जास्त रुची न वाटल्याने आम्ही दुसऱ्याच दिवशी तेथून निघून आले आलो! यानंतर १०-१२ वर्षांनी मी गणेशपुरीतील नित्यानंद महाराजांना शिवस्वरोदय शास्त्राच्या मार्फत आश्चर्यकारक जोडली गेले.

**जीवनात सध्या प्रचलित असणाऱ्या ध्यानाचा पहिला वाहिला अनभिज्ञ प्रवास!**

त्यांनतर एका चेन्नई येथून आलेल्या कोचचा एक कोर्स केला होता. माझा मुलगा लहान असल्याने मी अधिका अधिक नवीन तत्वे, पद्धती शिकून त्याचा व माझ्या विद्यार्थ्यांचा विकास करण्याचा प्रयत्न करत होते.

पण मानवाला आपल्याला मुळात काय हवे आहे हेच कळत नसते! आणि ते जर कळायचे असेल तर ध्यान केले पाहिजे. उदाहरण द्यायचे झाले तर समजा एखाद्याला आपले प्रवासाचे प्रॉब्लेम कमी होण्यासाठी नवीन मोठी कार घ्यावी असे वाटते आणि ती मिळाली तर कळते आपण याचा खर्च रोजच्या जीवनात करू शकत नाही, रोजच्या कामासाठी आपण हि इकडे तिकडे पार्किंगचा प्रॉब्लेम असल्याने नेऊ शकत नाही! मग लक्षात येते प्रॉब्लेम कमी न होता वाढले आहेत. पण जर श्वासावरील ध्यान केले तर असे होत नाही. कारण असे ध्यान योग्य त्याच गोष्टीची निवड करण्यास आपल्याला शिकवते. ध्यानाचा प्रवास हा न संपणारा अखंड आहे.अध्यात्म जीवनाात **पुस्तके काय करू शकतात? परम पूज्य पितामह ब्रम्हर्षी पत्रीजी पुस्तके वाचा हे का सांगतात ? माझ्यावर पुस्तकाने शक्तिपात घडवला!**

गोसावी मॅडमनी मला २-३ पुस्तके वाचायला लावली. यात एक परमहंस योगानंद यांचे 'योगी कथामृत ' हे हि होते. आधी पासूनच मला पुस्तके वाचण्याचा खूप छंद आहे हे हि पुस्तक एकाच दिवसात व रात्रीत बरेच वाचून काढले होते आणि सकाळीच नेहमीप्रमाणे बाल्कनीत बसून निसर्ग न्याहळत चहा पित असतानाच अती तीव्र कंपने सुरु झाली. पूर्ण शरीर एखाद्या चक्कीत घातल्या सारखे थरथरत होते. मी खूप घाबरून गेले. गोसावी मॅडम ना

विचाराले. त्यांनी मला सांगितले परम हंस योगी क्रिया योगातील होते व थेट क्रिया योगाच्या डॉक्टर रॉबिन घोष यांच्या महावतार बाबाजी यांच्या आश्रमात घेऊन गेल्या. मी तेथे गेल्यावर डॉक्टर रॉबिन यांनी सांगितले तुमच्यावर या पुस्तकाने शक्तिपात घडवला आहे. तुमचं पूर्व जन्माचे काही संबंध असतील. पण घाबरून जाऊ नका. ही कंपने तुम्ही स्वतः थांबवू शकता. तुम्ही त्या शक्तीला तशी विनंती करू शकता.

पण आता ध्यास लागला होता शक्तिपात म्हणजे काय? त्यांनी मला नर्मदा परिक्रमा यावर लिहलेली श्री .जगन्नाथ कुंटे, स्वामी मुक्तानंद यांनी लिहलेले 'चित्त शक्ती विलास' हे दुर्मिळ पुस्तक हे वाचण्यास सांगितले. ह्या पुस्तकाची छपाई होत नव्हती पण मी ते खास प्रयत्नाने छापून घेतले. याचा मला खूप उपयोग झाला. हे पुस्तक माझ्यावर ज्यांची शक्तिपात दीक्षा झाली त्या साई काकांचे गुरु मुक्तानंद स्वामी यांनीच लिहलेले होते. वर्षनुवर्षे ध्यान केल्यानंतर जे लाभते ते मला केवळ एका पुस्तकाच्या वाचण्याने मिळाले आहे!

### महावतार बाबाजी व पिरॅमिड यांचा प्रभाव !

नंतर ज्ञानेश्वरी ६ वा अध्याय, द सर्पट पॉवर व इतर असंख्य आध्यात्मिक पुस्तके वाचली. धनंजय देशपांडे यांचे 'प्रकाशाच्या वाटेवर' हे पुस्तक वाचण्यात आले. यात महावतार बाबाजी याचे शिष्य राम भोसले यांचे चरित्र वाचण्यात आले. सौ. मंजिरी जोशी यांचे महर्षी कृष्णानंद स्वामी यांचे गुरु व महान योगी अमरगुरू यांच्यावरील पुस्तक वाचण्यात आले. यात पिरॅमिड मधील ध्यानाबद्दल प्रथमच कळले. सप्त लोक, सप्त ऋषी, अवकाश विहार व बंगलोर जवळील चिक्कगुब्बी येथील तपोवन आश्रम याबद्दल वाचनाने मी अगदी झपाटून गेले! बाबांजीचा फोटो घेऊन ध्यान हि करू लागले. कधीतरी त्यांचे संदेश हि येत! बंगलोरला पिरॅमिड मध्ये जाऊन ध्यान करावे असे वाटू लागले.

### माझ्या विपश्यना ध्यान प्रवासाची कारण मिमांसा! अपमान व दुःख हरणासाठी विपश्यनेला कवटाळले

१२ वर्षांचा विभाग प्रमुख चा अनुभव असताना आणि यशाच्या उत्तुंग शिखरावर असतानाच २०१२ मध्ये अचानक एक दिवस आला आणि प्रोफेशनल सेट बॅक स्वीकारावा लागला! नोव्हेंबर २०१२ मध्ये जेव्हा आधीच्या शाखेत बदली केली गेली तेव्हा पचवणे अवघड झाल्याने २४ मे २०१३ रोजी नाशिक येथे १२ दिवसांच्या विपश्यना कोर्ससाठी गेले. तेथे तिसऱ्या दिवसालाच ध्यानाचे सामर्थ्य कळल्याने खूप ढसा ढसा रडले ! खरंच ध्यान हे दुःखावर किती छान फुंकर घालत आहे! त्याचे वेळेस हे ठरवले कि आता माझ्या उर्वरित आयुष्यात मी हे करेन! ध्यानाचा प्रसार हे बीज माझ्यात त्यावेळेसच पेरले गेले अगदी प्रकर्षाने! यश हे सांसारिक प्रगती देते तर अपयश हे आध्यात्मिक उन्नतीची वाटचाल करवते ! कॉलेज वर परत येताच सर्वांना हे सांगू लागले. ध्यान म्हणजे आयुष्याच्या उतरणीवरील करायची गोष्ट! अशी एक समज त्यावेळेस होती मीही २-४ महिन्याने ध्यानाला विसरून गेले!

### माझ्या आध्यात्मिक जीवनाला खत पाणी !

६-७ महिन्यांनी २० जानेवारी २०१४ चा दिवस उजाडला ! आमच्या डिपार्टमेंट मधे शेगाववरुन एक डॉक्टरेट प्रोफेसर म्हणून जॉईन झाले! दुसऱ्या दिवशीच मला जाणवले ते त्यांचा ऑरा! हा एका ध्यान धारणा केलेला व्यक्तीचा आहे हे मी जाणले आणि रिसर्च टॉपिक बरोबर ह्याही गोष्टींची चर्चा सुरु झाली! माझ्यात विपश्यनेच्या वेळेस जी बीजे पेरली गेली होती ती आता उफाळू लागली! नव्हे त्याच कारणासाठी नियतीने त्यांना पुण्यात पाठवले होते अशी माझी दृढ धारणा आहे! आणि सर शेगाव ह्या खेडेगावात असूनही पत्नी सहित डॉक्टरेट झाले ते या आध्यात्म्य व ध्यान धारणे मुळेच हे मला उमजून माझी मात्र शहरात असताना सुद्धा काहीच प्रगती झाली नाही म्हणून खूप दुःख होऊ लागले. त्यांनी जी पुस्तके

सांगितली होती. रामकृष्ण मठात जाऊन बरीच इंग्लिश, मराठी घेऊन आले व त्यांचा फडशा हि पाडला! आध्यात्मिक वाचनाने जीवन प्रवास परिपक्व होऊ लागला! आपली साधना व ध्यानातील आपले अनुभव हे गुप्त ठेवण्याचे दिवस आता गेलेत. आता नवीन शास्त्र आले आहे. त्या त्या योजने प्रमाणे आपण बदलले पाहिजे. ज्या कॉस्मिक योजना आहेत त्याला शरण जाऊन आपण बदलत गेले पाहिजे. अनुभव दुसर्यांना सांगणे, शिकवणे यातूनच आपण वेगाने आध्यत्मिक प्रगती करू शकतो. आपली साधना व ध्यानातील आपले अनुभव शेयर करा. हे आज ब्रम्हर्षी पत्रीजी हेच सांगत आहेत. सर्वांपर्यंत हे ज्ञान गेल्यानेच आपण भारतीय सुपर पॉवर बनणार आहोत कारण सुवर्ण युगात आपण प्रवेश करत आहोत. ह्या अमूल्य कार्यात आपला सहभाग होणे ह्यानेच आपली कर्मे सहज आणि वेगाने सुटत जाणार आहेत. आणि मुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

### परंपरेपासून आलेल्या शाश्वत ध्यानाची सुरवात!

आता मात्र माझे ध्यान अगदी पहाटे २-३ वाजल्या पासून सुरु झाले. अभ्यास करायचा असेल तर पहाटे लवकर उठावेच लागणार होते. मग मी नियमित अर्धा एक तास ध्यान करून साधारण ३ ते ६ वाजेपर्यंत रोज अभ्यास करू लागले. आपण ध्यान करू लागलो कि कितीही अवघड गोष्टी अगदी सहज पणे होतात हे कळू लागले. कंटाळा तर सोडाच पण थकवा हि कधी नसायचाच! ध्यानाची हीच तर जादू आहे. मला ह्या दिनचर्येत ध्यानाचे खूप अनुभव आले. कविता स्फ्फुरू लागल्या ! पहाटे ध्यान झाले कि हातात लेखणी येऊ लागली व २-३ मिनीटा मध्ये सरसर मराठी, इंग्लिश कविता साकारू लागल्या. लवकरच एक कविता संग्रह झाला. ह्याला नाव दिले 'दव बिंदू'! कॉलज मधे माझे व माझ्या सहकाऱ्यांचे व इतरांचे दुःख त्यात नकळत उतरत गेली. ध्यानाने दुःखाचे केले दवबिंदू ! ध्यान नसते तर हेच दुःख मी रडत रडत कुढत कुढत उराशी बाळगत बसले असते पण ध्यानाने मला कवियत्री बनून त्याच अश्रुंचे दवबिंदू केले ! आपल्या अंतर्गत जे असते तेच बाहेर येते असे मला सर म्हणाले होते. पण आज हे कळत आहे कि ते ध्यानामुळे होते. तसेच मी रामकृष्ण, गजानन महाराज, देवदूत, इतर कोणाचे संदेश हे माझ्याशी काय बोलत असत ते सरांना शेअर केले कि ते म्हणायचे हे बोलतात तुमच्याशी! पण तेही मला कळू लागले आहे. आपल्याशी असे कोणी बोलणे , दिसणे म्हणजे त्या त्या ऊर्जेशी, तत्वांशी आपण जोडू लागतो. त्यांच्याबरोबर संलग्नता येते. कारण हे सर्व गुण. तत्वे, ऊर्जा आपल्यामध्ये असतातच. म्हणूनच अहं ब्रम्हसि तत्वमसि! म्हणजे माझ्यातच सर्व काही सामावलेले आहे. पिंडी ते ब्रह्मांडी! आधुनिक शाश्त्राने हे सिद्ध केले आहे सर्व काही ऊर्जा आणि ऊर्जा, कंपने आणि वारंवारिता! त्यापलीकडे काही नाही! मग या ऊर्जेशी, लहरींशी आणि कंपनांशी आपण ध्यानातुनच जोडू लागतो! ध्यानामुळे संशोधन कार्यात झपाट्याने कल्पना सुचू लागल्या. अगदी वैश्विक स्तरावरील देवदूत, मास्टर्स ध्यानात येऊन सूचना करायचे अथवा ध्यानातून उठवून लॅपटॉप वर कामास बसले आणि आता काय करावे अडचण आली कि कित्येकदा हात हि पटपट फिरून सॉफ्टवेअर वर कमांड आपोआपच व्हायच्या ! ह्या ध्यानाच्या अनुभवामुळे माझे संशोधन कार्य अवघ्या २ ते अडीच वर्षात पूर्ण झाले जे होण्यास साधारण नोकरी करणारे ५-६ वर्षे कमीत कमी लावतात.! हे अनुभव खूप आश्चर्य चकित करणारे होते!

### भारतातील अति प्राचीन शिवस्वरोदय शास्त्र व ध्यान यांचा मिलाफ !

आपले जीवन हे कशासाठी आहे, आपण जन्म का घेतला आहे, आपल्या सभोतालची माणसे यांचे आपल्या पूर्वजीवनीतील नाते काय आहे, त्यांचे

आपण या जन्मी काय प्रोग्रॅम घेऊन जन्माला आले आहोत, आपल्याला त्यांच्या पासून दुःख का मिळत आहे, आपण काय बदल केले पाहिजेत हे समजू लागते. आपली कर्मे सहजपणे सुटत जाऊन तर पुढील जीवनाचे प्रोग्रॅम्स हि आपल्याला बदलता येतात व आपल्या आत्म्याची प्रगती लवकरात लवकर होऊन मुक्ती मिळू शकते हे मला पटत चालले आहे. एखादा गहण प्रश्न घेऊन ध्यानात श्वासाला विचारले कि समजू लागते. हे निर्णय अचूक ठरतात. आपल्यासाठी अगदी योग्यच असतात. विजय सरांनी जे शिकवले ते मी चटकन आत्मसात करून राबवूही शकले. ध्यान हे आपल्याला निसर्गाशी व वैश्विक ऊर्जेशी जोडते. आणि आज विहंगम केंद्राचे कार्य काय असेल ते त्यावेळेस ४-५ वर्षा पुरवीचं लिहून झाले. आज ती काळाची गरज झाली आहे पण त्यावेळेस पुसटशी कल्पना हि नव्हती. पण मी ध्यान करूनच लिहिल्याने तो कॉस्मिक पॉवरनेच लिहून घेतला होता! श्वास आणि आपला आचार विचार कसा असला पाहिजे हे शिकल्याने माझ्या जीवनात जे काही हवे ते लवकर प्राप्त करून मी एक सुखी जीवनाचे मार्गक्रमण करू शकले!

विहंगमच्या तिसऱ्या केंद्राचे नाव तितिक्षा आध्यात्मिक केंद्र असे २०१८ मधेच ठेवले होते! आणि हेमांगण फार्म हाऊस झाल्यावर परत अजून एक प्लॉट हेमंत यांना गुंतवणूक करावा वाटू लागला. जवळीलच सध्याची विहंगमची जागा मिळाल्याने ते नवीन कोरे सर्व साहित्यासकट तसेच पडून राहिले होते व त्यांनी ते विकण्यास काढले. हे आपण घेतले तर मला विहंगमचे कार्य करण्यासाठी जागाही मिळेल. आणि निर्णय होऊन प्रथम डील झाल्यावर लक्षात आले कि तितिक्षा च्या कामासाठी जे जे काही लागणार होते ते त्यासर्व काही आपल्याला वापरलेले मिळाले आहे! हा एक प्रचंड सुखद धक्काच होता. विहंगमचे तीन सेंटर्स आहे व येथेही सात रूम्स मिळाल्या जेणे करून येणाऱ्या लोकांना त्याची संकल्पना समजण्यास उपयुक्त असे बोर्ड आम्ही लावू शकलो ! हे हि मला कळून चुकले होते कि आधी ते तयार झाले (२०१४) आणि मग माझे विहंगम कागदावर अवतरले! (२०१८) आणि विकत घेतले गेले ऑक्टोबर २०२२! आणि सुरु झाले एप्रिल २०२२! इतकी प्रचंड क्षमता ध्यानात आहे!

आता ऑटो रायटींग सुरु झाले. ध्यान, श्वास, शिव, शक्ती असे काही लिखाण होऊ लागले. ध्यानाने आपल्या अनेक क्षमता जागृत होतात. सीद्धी मिळतात. पण आपण ठरवायचे कशात गुंतून नाही पडायचे. याचा आपल्या धनप्राप्तीसाठी, प्रसिद्धीसाठी उपयोग नाही करायचा. अगदी विजय सरांनी मला १००० साधकांसमोर मला आलेले अनुभव सांगण्यासाठी बोलण्यास लावले होते तेव्हाही हे पटवून दिले होते. मग जेव्हा जेव्हा याचा प्रसार करण्याची वेळ आली तेव्हा असेच वाटू लागले कि मी हे का करायचे? ध्यानामुळे मला वैराग्य का येत नाही? मी इतरां सारखी फायदे माझ्या मनातच का नाही ठेवत आणि का मी स्वःताची प्रसिद्धी करत असते. माझ्या या मानसिक द्वंद्वात हि मला ध्यानानेच मदत केली. १००० साधकांसमोर मला आलेले अनुभव सांगताना!

मी कोणाला तरी ज्ञान देत आहे असे मला ध्यानात दिसले. विजय सरांनी हि कोर्सला का आला आहात ते सांगायला लावले होते. इतर सर्वजण सांसारिक अडचणी सांगत होते. मी मात्र उतरले होते ज्ञान घेण्यासाठी! तर मग मला कळून चुकले कि बुद्धाने साक्षात्कार घडल्यावरही विपश्यनेचा प्रसार केलाच होता. आज मी जे करत आहे व पुढील काही वर्षात करणार आहे ते मला दिसत होते हे मी खूप आधीच सरांना सांगत होते. मी एक पिरॅमिड बांधणार आहे असे हि मी ह्या दोघांना म्हणायची. आता हे सर्व ७-८ वर्षांनी खरे ठरत आहे.

मला आठवते अमेरिकेचे आशिया पॅसिफिक लीडरशिप फ्फ़ेलोशिप साठी निवड हि ध्यान आणि शिवशास्त्र हे तंत्र वापरल्या मुळेच झाली ! १६

देशातून १५ जणांच्या टीममध्ये मी एक होते! ९.५ लाख हि स्कॉलरशिप मला २०१९ मध्ये मिळाली. मी ध्यान करत होते व श्वासाच्या नियमाने सर्व काही जाणून घेत होते. काय प्रश्न मला मुलाखतीत विचारणार ते जाणून घेतले आणि तसेच झाले! मुलाखत रेकॉर्ड केली आणि ऐकल्यावर कळले आपली निवड होणारच! आणि १००० पेक्षा जास्त अर्जातून निवड झाली होती! आशिया पॅसिफिक्रिक प्रांतात शांती, एक मेकांमध्ये समजूत, नाते संबंध, समृद्धी कोण घडवून आणू शकते अशा नेतृत्व गुणाने समृद्ध असणाऱ्यांना हि अमेरिकेची ई.डब्लू.सी नावाजलेली संस्था प्रशिक्षण देत असते.

ऐवटी एकच सांगू वाटते अहं ब्रम्हासि अहं तत्वमसि ! हे ध्याना मुळेच समजू लागते! आणि या मुळेच आता मोठा पिरॅमिड बांधायचा ठरवला आहे कारण तो सर्वांना खेचून खेचून आणतो व ध्यानाचे तिप्पट वेगाने फायदे देतो ! आपले घर आपले कुटुंब यापलीकडे आपण बघायला शिकले पाहिजे. एक भव्य दिव्य स्वप्न साकार करत आपले काही आयुष्य तरी समाजाच्या उपयोगी खर्ची केले पाहिजे! याहून मोठे ते काय असणार आहे?

**छिरॅमिड इंटरनॅशनल व्हॅली व पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटीज मुहमेंट ग्लोबल अकॅडमिला जोडली गेले !**

२७ ऑगस्ट २०२१ मध्ये मी प्रथम २१ दिवसांचा ऑस्ट्रेलियातील प्रदीप विजय यांचा पिरॅमिड व्हॅली इंटरनॅशनल ने आयोजित केलेला ''सेल्फ ट्रान्सफॉर्मेशन'' कोर्स केला. तो मला अतियशय आवडला.

मग नंतर ४-२४ सप्टेंबरला कोर्स केला तो श्रेयांस डागा यांचा मॅनिफेस्टेशन डिकोडेड द रियल सीक्रेट बिहाईन्ड!ङ्क श्रेयांस डागा फौंडेशन, पिरॅमिड व्हॅली इंटरनॅशनल व पिरॅमिड स्पिरिचूअल सोसायटी मुहमेंट ग्लोबल अकॅडमि यांच्या संयोजनाने आयोजित केलेला !

१४ मार्च ते २२ एप्रिल २०२२ मध्ये ब्रम्हर्षी पत्रीजींची कन्या परी पत्री यांचा ''रिइन्व्हेन्ट युवरसेल्फ' हा ४० दिवसांचा कोर्स केला. यामध्ये खुद्द पत्रीजींशी बोलता आले. २६ मार्च ते २२ एप्रिल हा डॉक्टर साईसागर यांचा ६ शनिवारचा 'लिविंग इन कोहीरन्स' व परी पत्री यांचा २३-२४ एप्रिल व ३०-१ मे हा कॉन्शस टीचर्स ट्रैनिंग कोर्स हे खुप खडतर कष्ट करून कॉलेजचे काम, विहंगमचे काम, आय यु सी सी चे काम करत करत रात्रं दिवस राबत राबत धडाक्याने पूर्ण केले आहेत.

परी पत्री यांचा कोर्स जसा केला तसा कॉलेजचे काम लवकरच सोडावे असे वाटू लागले. कारण आता ध्यास लागला आहे तो एक मोठा पिरॅमिड बांधण्याचा, व तेथे पिरॅमिड इंटरनॅशनल व्हॅली/ स्पिरिच्युअल सोसायटीज मुहमेंट ग्लोबल अकॅडमि चे केंद्र सुरु करण्याचा! विहंगम टेकनो होलिस्टिक ऑर्गनायझेशन, पिरॅमिड व्हॅली इंटरनॅशनल व स्पिरिच्युअल सोसायटी मुहमेंट ग्लोबल अकॅडमि याअंतर्गत भारतातील सर्व तांत्रिक उच्च शिक्षण संस्थांमध्ये ध्यानाचे विद्यार्थी-शिक्षक यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कोर्स घेण्याचा!

**आमच्या तितिक्षा स्पिरिच्युयल केंद्रात आगामी होणाऱ्या सुदर्शन पिरॅमिडचा बुद्ध पौर्णिमाच्या दिवशी साक्षात्कार !**

दिनांक १६ मे २०२२ रोजी बुद्धपौर्णिमे निमित्त आमच्या 'तितिक्षा' या अध्यात्मिक केंद्रात सिनियर पिरॅमिड मास्टर अवनी राव यांचा ध्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मी ५० जण येतील हा संकल्य ठेवला होता. पण पल्लवी मॅडम ने तो ६० करण्यास सांगितल्याने वाढवला. यामध्ये अगदी तेवढीच लोके तेथे पोहचली वा जसे ठरवले होते तसेच झाले. अवनी माँ नीं मला आदल्या दिवशीच तेथे ध्यान करून सांगितले होते येथे त्यांना विष्णुचे सुदर्शन चक्र फिरताना दिसले! त्यामुळे त्यांनी त्यास सुदर्शन पिरॅमिड असे नाव सूचित केले. तेथे त्यांना विष्णु लक्ष्मीची ऊर्जा जाणवली. मग मीही त्यांना सांगितले इथे सतत मोर फिरत असतात. मोर हे

लक्ष्मीचे वाहन! आता हाही काय योगा योगच होता का? तर नव्हे ध्यानामुळे हे दिसू लागते. अवनी माता यांनी रात्री ध्यानात अनुभवले होते कि अगस्त्य ऋषी तेथे संचारीत होते. सप्तऋषींचा तेथे सहवास जाणवत होते. बरेच मास्टर्स तेथे आलेले होते व यांनी सांगतले कि या जागेत पिरॅमिड बांधला तर येथे येणाऱ्यांचे हीलिंग चांगले होईल. वरील तीन चक्रे खुली होतील. मला ध्यानात रात्री संदेश आला होता कि उद्या जे येणार आहेत ते सर्व महामानव येणार आहेत आम्ही सर्वजण त्यांच्या मार्फत आगामी पिरॅमिड साठी ऊर्जा घेऊन येणार आहोत!

१६ मे २०२२ च्या बुद्ध पौर्णिमेच्या आदल्या रात्री पिरॅमिड जागेवर रात्री मी, माझे मिस्टर हेमंत, पल्लवी मॅडम व अवनी माँ यांनी ध्यान केल्यावर, अवनी माँ ना जाणवली विष्णू-लक्ष्मी ऊर्जा व त्यांच्या मुखातून सुदर्शन पिरॅमिड चे हे नाव प्रकट झाले!

बुद्धपौर्णिमेच्या सकाळी पहाटे ३ ते ६ वेळेमध्ये ध्यान करताना पिरॅमिडचे चित्र डोळ्यासमोर येऊ लागले. मी जसेच्या तसे कागदावर रेखाटन करू शकले होते! मी दोन मजली पिरॅमिड अजून बघितला नव्हता पण नजरेसमोर तो दोन मजलीच साकार होऊ लागला. मला तो कशासाठी, डाव्या बाजूस काय, उजव्या बाजूस काय, खालील मजल्यास दार कोठून, वरील मजल्यास कोठून, आजू बाजूचे दृश्य बघण्यास काय सोय करावी. वर बसून मी काय करावे, खाली बसून मी काय करावे, माझे पुढील कार्य कसे असणार आहे ते सर्व समजू लागले. सात नंतर हळू हळू सर्व जण येऊ लागले. त्यांना ऊर्जा जाणवू लागली व आम्हाला हि! नंतर अवनी माँ नीं ध्यान घेण्यास सुरवात केली. सर्वात प्रथम दिसले ते कश्यप ऋषी नंतर अगस्त्य ऋषी! अवनी माँ यांना हि ते रात्री दिसले होते यात काहीही आश्चर्य नाही!

बुद्धपौर्णिमेच्या दिवशी ध्यानात झालेल्या पिरॅमिडचा साक्षात्कार सांगताना !

कारण हे माझ्याशी संबंधितच होते. माझी जेव्हा नाडी परीक्षा बघतली होती तेव्हा अगस्त्य ऋषींनीच त्यांना पुढे काय दिसत आहे ते त्यांनी माझ्या बद्दल वर्णिलेलें आहे. सप्त ऋषींना तर मी आधीपासूनच जोडलेली आहे. कारण मला दीक्षा दिलेले साई काका हे तेथे सूक्ष्म रूपाने जात असतात व त्यांच्या संदेशाने कार्य करत असतात. नंतर गणपती आले त्यांनी मला सांगितले तुला अजून संशोधन करायचे आहे. म्हणून विद्येची ऊर्जा येथे राहू देणार आहे. मेटाफिजिक्स, जीवन, सत्य, ज्ञान यांच्या स्वरुपाविषयीचे तत्वज्ञान यावर मी संशोधन करणार आहे. हे इन्स्टिंक्टस मला ७-८ वर्षापासूनच येत आहेत. हे कार्य मी पिरॅमिडच्या खालच्या अभ्यासिकेमध्ये बसून करणार आहे हे मला गणपतीने सूचित केले.

मग ब्रम्हर्षी पत्रीजी आले व म्हणाले बेटा तू अगदी योग्य निर्णय घेत आहे. मी आलो आहे. माझ्या डोळ्यातून गरम गरम अश्रू गालावर ओघळू लागले. मग त्यांनी बासरी वाजवण्यास सुरवात केली. आणि माझे अश्रू चालूच होते. शिव शंकर आले त्यांच्या समोर पिंड होती. मी ओंकार म्हणू लागले. नव्हे ते कोणीतरी म्हणून घेत होते, नंतर मी अवनी मातेस विचारून अश्रू आणि ओंकार यांची खात्री करून घेतली. त्यांनी आवाज ऐकले व अश्रू पहिले होते.

आता हळू हळू ध्यानात तो गोल्डनच पिरॅमिड दिसत होता! प्रचंड डायमंडस मधून गोल्डन प्रकाश बाहेर पडत होता व आसमंतात पसरत होता! नंतर शेवटी मीच पिरॅमिड झाले होते व ती सर्व किरणे, गोल्डन प्रकाश परिसरात पसरवत होते असे अनुभवले. एवढेच नाही तर तो पिरॅमिड आता तेथे अस्थूल/ सूक्ष्म स्तरावर उभा आहे असेच जाणवत आहे! हे लिहत असताना मला आता कळत आहे कि अरे हाही प्रकाश आपल्यातच सामावलेला आहे. ध्यानात अति उच्च अवस्थेत आपण पोहचले की आपण उरतो ते प्रकाशमय हे मला कालच्या एका श्री. साई कुमार यांनी पाठवलेल्या एका चित्राचे मेसेज वरूनच आता लिहताना संदर्भ लागत आहे! अहं ब्रम्हासि तत्वमसि हे पुन्हा एकदा प्रकर्षाने अनुभवले ! नंतर ध्यानात बरेच काही होत होते. तब्बल दोन

तासांनीच मी डोळे उघडले! असे सलग झालेले हे माझे पहिलेच ज्ञान होते! हा ध्यानातील अनुभव विलक्षण होता!

शेवटी जेव्हा अवनी माँ नीं सर्वांना अनुभव कथन करण्यास सांगितले तेव्हा ३-४ जणांनी सोनेरी किरणे, सोनेरी लख्ख प्रकाश, तळपता सूर्य, सोनेरी चक्रे पाहिल्याचे सांगितले. या नंतर मी अनुभव कथन केला व सर्वात शेवटी माँ नीं ! त्याही म्हणाल्या सुदर्शन चक्र फिरत होते. म्हणजे आमच्या सर्वांचे अनुभव जुळत होते ! हा काही चमत्कार नव्हता तर ती वास्तविकता होती ध्यानाच्या सामर्थ्याची ! पिरॅमिड्च्या पॉवरची ! पिरॅमिडची नुसती कल्पना केली तरी पुरते असे म्हणतात ते काही खोटे नाही!

दोन मजली पिरॅमिड मला का दिसला हे नंतर मला समजले. शंकराचे मंदिर आधीच्या ध्यानात आले होते. मी गेल्या महिन्यात प्रथम पिरॅमिड साठी संकल्प ठेवून ध्यानास बसले होते तेव्हा अगदी आता पिरॅमिड ची जी जागा निश्चित झाली आहे. तेथेच तो दिसला होता. आम्ही वेगळ्या जागेमध्ये विचार करत होतो. त्यामुळे येथे मला का दिसला. तसेच एक शिवाचे मंदिरही बाजूला दिसले होते. पण पिरॅमिड मध्ये मंदिर कशाला? व जागाही वेगळी का दिसत आहे म्हणून मी ध्यान सोडले. साशंक झाले. व गप्प बसून राहिले होते. मग आता पर्यायी उपायाने काय निष्कर्ष लागतो बघुयात असा विचार केला. ऊर्जा मास्टर श्री. विजय पाटील यांना बोलवून दोन्ही ठिकाणाची ऊर्जा तपासून पहिली! आता यांचे नाव लिहताना माझ्या अंगावर काटा आला आहे!! माझ्या जीवनावर 'विजय' या नावाच्या व्यक्तींचा खूप प्रभाव आहे. विजय पवार, माझे अंतर्देशीय ज्योतिषी विजय वाणी, आणि आता हे पिरॅमिड बांधणारे हि विजयच! तर त्यांनीही ह्याच विहंगम मधीलच तितक्षेच्या जागेस संमती दर्शवली होती. सध्याच्या ध्यानाच्या जागेतही बघून सांगितले होते कि कॉस्मिक, अध्यात्मिक, पृथ्वी, जल ह्या सर्वांची ऊर्जा भरपूर असून बॅलन्स्ड आहे. मग आता माझ्या लक्षात आले कि मला इथेच आधी पिरॅमिड दिसला होता.!

छिरॅमिडच्या भूमी पूजन आधी पितामह पत्रींजींना जोडले जाण्याची इच्छा ध्यानानेचे आश्चर्यकारक पूर्ण केली!

२२ तारखेला सुदर्शन पिरॅमिड साठी भूमी पूजन ठरले होते. खूप इच्छा होती त्याआधी ब्रम्हर्षी पत्रींजींचा संपर्क व्हावा. पण बंगलोरला जाणे जमत नव्हते. मी अवनी माँ ना घरी बोलावले होते. आम्ही ध्यानास बसलो. १५ मिनिटे ध्यान होताच माँ चा फोन खूप खन खणू लागला. आणि अचानकच त्यांनी फोन माझ्यासमोर धरला. विडिओ स्क्रीन वर खुद्द पितामहच होते! विश्वासच बसेना! बोलता येणं बंद झाले! घळ-घळ अश्रू वाहत होते. त्यांचा तेजस्वी ऊर्जा प्रवाह माझे डोळे दिपवत होता. माँ बोला बोला म्हणत होत्या आणि अश्रू वाहतच होते. मग एकच वाक्य बाहेर पडली हमारा कितना गहिरा कनेक्शन है ! बहुत गहरा! आणि पुढे काहीही बोलू शकले नाही! मग माँ व माझे पती बोलले व परत त्यांनी फोन माझ्याकडे दिला. मग मी सांगितले मला असे असे काम करायचे आहे. ते म्हणाले उसके लिये तो आये हे हम! मग मी उद्या भूमी पूजन आहे तुम्ही सूक्ष्म स्वरूपात हजार व्हावे व मी २४ ला बंगलोर ला येणार आहे म्हणाले. आणि ते या म्हणाले! फफ्रोन बंद झाल्यावर मग माँ ना विचारले त्या म्हणाल्या तिथे त्यांच्या कोणी ओळखीच्या पत्रीजींना भेटण्यास गेल्या होत्या त्यांनी कॉल केला होता! माझी ऊर्जा प्रचंड जाणवत होती. पत्रींजींच्या फफ्रोन ने भरपूर ऊर्जा प्रवाहित केली होती! मला लगेच ध्यानाची पॉवर

कळली! माझी ऊर्जा प्रचंड जाणवत होती. मला लगेच ध्यानाची पॉवर कळली! ध्यानाने काहीही साध्य होते! कारण एकच आहे! जे ध्यानातुनच अपल्याला समजू लागते, उमगू लागते ते अहं ब्रम्हासि अहं तत्वमसि



२४ मेला मी व माझे पती हेमंत लगेच बेंगलोरला पिरॅमिड व्हॅली इंटरनॅशनल येथे ब्रम्हर्षी पत्रीजींना भेटण्यास गेलो. प्रथम तेथील भव्य दिव्य पिरॅमिड मध्ये ध्यान केले. एका क्षणात तेथे मी एमटीनेस अनुभवला ! ध्यानात शून्य हा अनुभव अगदी उच्च आहे हे मला नंतर कळाले! खरंच खूप अद्धुत शक्ती आहे तेथे. नंतर पॅगोडा मध्ये पितामह पत्रींची भेट घेतली. ते दोन दिवस पूर्ण विश्रांती व मौनात होते पण माझ्याशी बोलले आणि मी कृतार्थ झाले! त्यांना बघताच अश्रू आले! मी काय करत आहे आणि मला पुढील आयुष्यात काय करायचे आहे ते सांगितले. ते म्हणाले हजारो शिक्षक आहेत पण तू जे करत आहेस ते युनिक आहे! म्हणूनच तू माझ्या पर्यंत पोहचली आहेस. हे समजून घे. आनापानसती हाच मार्ग आहे !आणि तेच काम चालू ठेव! मन खूप ढवळून निघाले होते आणि आता लवकरच राजीनामा देऊन हेच काम पुढे करत राहण्याचा निच्चय पक्का केला आणि घरी येताच २१ दिवसांचा सुदर्शन पिरॅमिड ध्यानाचा कार्यक्रम पक्का केला! सध्या तो २०० जण करत आहे आणि माझी व्हेकेशन सुट्टी अशी कारणी लागत आहे याहून अजून कोणते समाधान असणार आहे ?





**सुदर्शन पिरॅमिडचे भूमिपुजन सोहळा वर्दे खुर्द, तालुका भोर, जिल्हा पुणे २२ मे रोजी श्री. व सौ. धेंडे यांच्या हस्ते सिनीयर पिरॅमिड मास्टर्स अवनी मॅडम, ब्रम्हर्षी शशिकांत जोशी, पिरॅमिड तज्ञ विजय पाटील पिरॅमिड मास्टर्स व धेंड कुटूबिय यांच्या उपस्थितीत आनंदात संपन्न झाला.**